दैनिक **अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज**

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक २६३ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.२३ डिसेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com


## जयंत पाटील यांच्यावर निलंबनाची कारवाई

**दै.रायगड नगरी । नागपूर**



विधानसभा अध्यक्षांविरोधात अपशब्द वापरल्याप्रकरणी राष्ट्रवादीचे आमदार जयंत पाटील यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली. नागपूरमधील हिवाळी अधिवेशन संपेपर्यंत जयंत पाटील यांचे निलंबन करण्यात आले आहे. दरम्यान, याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते रविकांत वरपे यांनी शिंदे-फडणवीस सरकारवर निशाणा साधला आहे.

आज हिवाळी अधिवेशनात महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला काळीमा फासणारी सत्ताधारी शिंदे-फडणवीस सरकारकडून घटना घडली आहे, असे रविकांत वरपे म्हणाले.

तसेच, महाराष्ट्राच्या राजकारणात जयंत पाटील सुसंस्कृत राजकारणी, अभ्यासू,संयमी नेते म्हणून ओळखले जातात.

# पनवेल बार असोशिअनच्या अध्यक्षपदी सलग तिसऱ्यांदा ॲड.मनोज भुजबळ बहुमताने विजयी






**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल बार असोशिएनच्या सन २०२२ ते २०२५ च्या कार्यकारिणी साठी झालेल्या निवडणुकीत ॲड. मनोज भुजबळ हे सलग तिसऱ्यांदा दणदणीत विजयी झाले. मागील त्रैवार्षिक कार्यकारिणी काळातील २ वर्षे हि कोरोना मुळे वाया गेल्याने यावेळी नवीन व जुन्या कोर्टातील प्रलंबित कामासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करणार असल्याचे मत ॲड मनोज भुजबळ यांनी व्यक्त केले.

पनवेल बार असोसिएशन कार्यकारिणीची निवडणूक बुधवारी संपन्न झाली या निवडणुकीचा निकाल रात्री उशिरा जाहीर झाला या निवडणुकीमध्ये मोठ्या संख्येने मतदान झाल्याने निवडणूक अत्यंत चुरशीची बनली होती. एकूण ९९७ मतदार संख्या असलेल्या या निवडणुकीसाठी नवीन कोर्ट इमारत येथे या मतदान केंद्र उभारण्यात आले. या निवडणुकीत माजी अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ पुन्हा तिसऱ्यांदा अध्यक्षपदासाठी रिंगणात उभे असल्याने हि निवडणूक चुरशीची झाली होती. या निवडणुकीत ॲड. मनोज भुजबळ यांच्या पॅनेलने ११ उमेदवार उभे केले होते. यापैकी ॲड.सुशांत घरत हे बिनविरोध निवडून आले होते. मतदानाच्या वेळी पहिल्या फेरी पासूनच ॲड. मनोज भुजबळ आघाडीवर होते व ते भरघोस मताने विजयी झाले तसेच सचिव पदासाठी ॲड.प्रल्हाद खोपकर हे चौथ्यांदा विजयी झाले त्याचप्रमाणे उपाध्यक्षपदी ॲड. संदीप जगे हे बहुमताने विजयी झाले त्याचप्रमाणे सहसचिव पदी ॲड.सीमा भोईर, खजिनदार पदी ॲड.धनराज तोकडे, ऑडीटरपदी विशाल मुंडकर, तर सदस्यपदासाठी ॲड. प्रगती माळी, छाया म्हात्रे, अमित पाटील, भूषण म्हात्रे हे विजयी ठरले आहेत. या विजयासंदर्भात बोलताना ऍड. मनोज भुजबळ यांनी सांगितले कि बेंच आणि बार यांच्यातील सलोख्याचे संबंध राहतील यासाठी प्रयत्न करणार तसेच नवीन कोर्टासाठी लायब्ररी, कँटीन आदी प्रश्नांसह जुन्या कोर्टातील प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करू व सर्वांना एकत्रित घेऊन काम करू असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. या निवडणुकीचे कामकाज मुख्यनिवडणूक अधिकारी म्हणून ॲड. एच. जे. शेळके यांनी पहिले त्याचप्रमाणे सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून ॲड.शशिकांत म्हात्रे, ॲड.राजेश पाटील, ॲड.जगदीश ठाकूर, ॲड. राजेश खंडागळे, ॲड.विकी दुसिंग, ॲड.दक्षता पूनकर, ॲड.त्रिवेणी भगत, ॲड.सोमनाथ पाटील, ॲड.कल्पेश कांबळे, ॲड.संदीप मुंडकर, ॲड. ज्ञानेश्वर पाटील, ॲड.नितीन पाटील, ॲड.प्रणित मालगुडकर यांनी कामकाज पाहिले

## म्हसळा चेक नाक्याजवळ एस टी बसला कार धडकुन अपघात



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

दिनांक २२ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी साडे अकरा वाजता एस.टी.बस क्रमांक एमएच.१४ बीएफ २३२२ बस स्वारगेट कडून म्हसळा श्रीवर्धनकडे येत असताना म्हसळा साईचेक पोस्ट जवळ म्हसळा शहरा कडून जाणारी (टाटा आर्या)मोटार कार क्रमांक टीएस ०७बीएफ २३२२ गाडीला एसटी बसला धडकली असता एसटी बस रस्त्याचे बाजूच्या नाल्यामध्ये कलंडून अपघात झाला.

अपघातामध्ये चिरगाव येथील शाळेकरी प्रवाशी मुलगी आर्या पाडावे किरकोळ जखमी झाली होती तीला म्हसळा ग्रामीण रुग्णालयात दाखल करून उपचार करून घरी पाठविले तर या अपघातात बस चालकाचे पायाला व हाताला मार लागला असल्याचे सांगण्यात आले.अपघातात मनुष्य हानी झाली नसली तरी अपघाती गाड्यांचे नुकसान होऊन वित्त हानी झाली आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक संदीपान सोनवणे आणि पोलिस पथक तसेच स्वंयसेवी नागरिकांनी घटनास्थळी जाऊन मदत केली.

## कोविड परिस्थिती नियंत्रणात ; नागरिकांनी घाबरून जाऊ नये

# जिल्ह्यांमध्ये आरोग्य सुविधा सज्ज राहतील याची पालकमंत्र्यांनी दक्षता घ्यावी : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । नागपूर**

जगातील कोरोनाच्या उद्रेकाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात देखील खबरदारी घेण्यात येत आहे. नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असे आवाहन करतानाच सर्व पालकमंत्र्यांनी आपापल्या जिल्ह्यांमध्ये आरोग्य सुविधा सज्ज राहतील याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे मुख्य सचिवांनी देखील तातडीने सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी संवाद साधून कोविड अनुरूप वर्तन, पंचसूत्रीचे काटेकोर पालन होईल, हे पाहण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिले.

मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी मुख्यमंत्र्यांनी विधानभवनात विशेष बैठकीत राज्यातील कोविड परिस्थितीचा आढावा घेतला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीष महाजन, आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत, अन्न व औषध प्रशासन मंत्री संजय राठोड, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव आदी यावेळी उपस्थित होते.



राज्यातील कोविड परिस्थिती पूर्ण नियंत्रणात असली तरी आंतरराष्ट्रीय पातळीवर मात्र चीन, जपान, अमेरिका, ब्राझील या देशांमध्ये रूग्ण वाढताना दिसत आहेत. चीनमध्ये कोविड विषाणूचा बीएफ.७ हा प्रकार अधिक वेगाने वाढताना आढळत आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील जनुकीय क्रमनिर्धारण व्यवस्थेची माहिती आणि आढावा यावेळी घेण्यात आला.

आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. संजय खंदारे यांनी कोविड परिस्थितीबाबत सादरीकरण केले. राज्यात सध्या २२१६ कोविड रुग्णालये असून १ लाख ३४ हजार विलगीकरण खाटा असल्याचे यावेळी सांगण्यात आले. चाचण्या, ट्रॅकींग, उपचार, लसीकरण आणि कोविड अनुरूप वर्तन अशी पंचसूत्री राबविण्याचे केंद्र शासनाने निर्देश दिले आहेत. त्यानुसार सर्व जिल्ह्यांमध्ये पंचसूत्रीची अंमलबजावणी करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.


# मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर तीन गाड्यांचा अपघात

**दै.रायगड नगरी । खोपोली**

आज दि. २२ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी ६ वाजेच्या सुमारास मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर किलोमीटर ३९/४०० दरम्यान तीन गाड्यांचा अपघात झाला. अपघात भीषण होता, पण सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. काही प्रवाशांना किरकोळ जखमा झाल्या आणि गाड्यांचे नुकसान मोठ्या प्रमाणात झाले.

मुंबईकडे जाणारा ट्रक (क्र.- TN 39, CM 9227) वरील चालक आर. अरुण (वय- ३६ वर्ष) रा. कर्नाटक याचे ट्रकवरील नियंत्रण सुटल्याने ट्रकचे पुढे जाणाऱ्या आय २० कार (क्र. MH 48, P 3689) ला मागून धडक दिली. त्यानंतर पुढच्या व्हॅगनार कार (क्र. MH 12, GK 4286) ला धडक मारून काही अंतर फरफटत नेले. यात कारमधील महिला जखमी झाली तीला उपचारासाठी एमजीएम हॉस्पिटल पनवेल येथे रवाना केले.

अपघातात बाधित झालेल्या दोन्ही कारमधील प्रवाशांनी सीटबेल्ट लावल्याने मोठी हानी टळली, असे प्रत्यक्षदर्शीनी सांगितले. अपघाताची माहिती मिळताच आयआरबी पेट्रोलिंग टीम, देवदूत यंत्रणा, लोकमान्य म्बुलन्स सेवा, बोरघाट वाहतूक पोलीस, डेल्टा फोर्सचे जवान मदतीसाठी आल्याने मदतकार्य वेळेत पार पडले. बाधित वाहने लागलीच बाजूला काढल्यामुळे वाहतूकही खुली झाली. हा अपघात खोपोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत झाला आहे.



## भटारखान्यातून भांड्यांसह विविध वस्तूंची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरातील देवाळे तलावाच्या बाजूला असलेल्या स्नेह सागर कॅटरिंग च्या कौलारू भटारखान्यातून अज्ञात चोरट्याने भांडीसह इतर साहित्य चोरून नेल्याची घटना घडली आहे.

अनिल तेरडे (वय ६२) यांचे पनवेल मनपा समोरील देवाळे तलावाच्या बाजूला असलेल्या स्नेहसागर कॅटरिंग च्या कौलारू भटारखान्यात अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून आत मध्ये असलेले विविध प्रकारच्या वाट्या, परात, स्टील ची भांडी, टाकी, प्रेशर कुकर व इतर साहित्य असा मिळून जवळपास ९, २७०ड- रुपये किमतीचा ऐवज चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# भाजप आ.मुक्ता टिळक यांचं पुण्यात निधन

पुणे : पुण्यातील कसबा मतदारसंघाच्या भाजपच्या आमदार तथा पुण्याच्या माजी महापौर मुक्ता टिळक यांचं निधन झालं आहे. त्या ५७ वर्षांच्या होत्या. गेल्या अनेक महिन्यांपासून त्या कर्करोगाशी झुंजत होत्या. पुण्यातील गॅलेक्सी केअर रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु होते. तिथेच त्यांनी अखेरचा श्वास घेतला. भाजपच्या प्रामाणिक कार्यकर्त्या, पक्षादेशाला त्यांनी नेहमी प्रमाण मानून राजकीय जीवनात काम केलं. अगदी कर्करोगाशी झुंजत असताना त्यांनी व्हिलचेअर बसून मुंबईत येऊन राज्यसभा आणि विधान परिषद निवडणुकीकरिता मतदान केलं. कर्तव्यनिष्ठेला महत्त्व देणाऱ्या कार्यकर्त्या आज आमच्यातून गेल्या, अशा भावना पुणे भाजपचे पदाधिकारी करत आहेत.



मुक्ता शैलेश टिळक २०१९ च्या राज्य निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या सदस्या म्हणून कसबा पेठेतून विधानसभेवर निवडून आल्या होत्या. २०१७ ते २०१९ या काळात त्या पुण्याच्या महापौर होत्या. महापौर म्हणून केलेल्या कामावर खूश होऊन पक्षाने त्यांना विधानसभेची उमेदवारी दिली. गिरीश बापट यांच्या कसबा मतदारसंघातून त्यांनी दणक्यात विजय मिळवून विधानसभेत पाऊल ठेवलं. पण त्याचवेळी त्यांनी कर्करोगाची लागण झाली. पुढे दोन ते अडीच वर्ष त्यांना कर्करोग आणि अनेक व्याधींनी ग्रासलं होतं. त्यामुळे सार्वजनिक जीवनातला त्यांचा वावर अतिशय कमी झाला होता. पण रुग्णालयातून त्या लोकांची कामे करत राहिल्या, अधिकाऱ्यांना सूचना देत राहिल्या. पण आज कर्करोगाशी सुरु असलेली त्यांची झुंज अपयशी ठरली.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, खालील वर्णनाची मिळकत मौजे : शिवकर, ता.पनवेल, जि.रायगड येथील आहे.

**मौजे : शिवकर, ता.पनवेल, जि.रायगड**

| गट नं. उपविभाग | भूधारणा पद्धत | हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ३६/१ | भोगवटदार क्र.१ | ०-१५-२०<br>०-१८-२० | ०.५६ |

वरील मिळकत ही श्रीमती.सविता तुकाराम पाटील यांच्या मालकीची आहे. सदर मिळकत ही धिरज कुमार महेंद्र कुमार शुक्ला व श्री.निरजकुमार महेंद्रकुमार शुक्ला यांनी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. जर कोणाची हरकत, साठेकरार, विक्री करार, बोजा, गहाणखत असल्यास त्यांनी खालील पत्यावर संपर्क करावा.

दि.२२/१२/२०२२

**सही/-**

**ॲड.धर्मनाथ नामा गोंधळी**

**हायकोर्ट मुंबई, बी.एससी एल.एल.बी.**
**निळकंठ हाईटस्, नं.-७०२,**
**सेक्टर-१६, कळंबोली, नवी मुंबई**
**मो.नं.९३२३४४१०८०**

---

मे.एन.सोनवलकर सा़ो

ॲड.दिनानाथ के. सोनकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज कनिष्ठ स्तर साहेब यांचे कोर्टात

चौ.अर्ज नं.१४१९/२०२२

ने.ता.२३/०१/२०२३

श्री.बाळकृष्ण बंदू भोईर
वय : ४७ वर्षे, धंदा : मजूर
रा.घर नं८७ बी, वरची आळी,
विचुंबे गाव, ओ.एन.जी.सी. कॉम्प्लेक्स,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

ग्रामपंचायत अधिकारी / ग्रामसेवक
ग्रामपंचायत विचुंबे,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

अर्जदार यांनी जन्म दाखला मिळणे करिता पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज कनिष्ठ स्तर साहेब यांचे कोर्टात फौजदारी चौकशी अर्ज दाखल केलेला आहे. तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांची आई कै.बाबीबाई बंडू भोईर हिचा मृत्यू दि.०६/०१/२०१९ रोजी त्यांच्या राहत्या घर नं.८७ बी, वरची आळी, विचुंबे गाव, ओएनजीसी कॉम्प्लेक्स, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाला आहे. अर्जदार यांनी त्यांची आई कै.बाबीबाई बंडू भोईर यांच्या मृत्यूची नोंद होणेकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सा़ो.पनवेल यांचे न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू कै.बाबीबाई बंडू भोईर ह्या वरील तारखेस व ठिकाणी मृत्यू झाल्या आहेत किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर दैनिक रायगड नगरी या जाहीर नोटीसीच्या तारखेच्या १ महिन्याच्या आत त्याने या मे.न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू व्यक्तीने मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देण्यात येईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.२२/१२/२०२२ रोजी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**

---

# प्रणिती प्रभाकर काळे-खेरडे या राज्यस्तरीय क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल येथील रहिवासी असलेल्या व सध्या एम. बी. मोरे फाउंडेशनच्या आर्ट कॉमर्स सायन्स महिला कॉलेज च्या प्रिन्सिपल म्हणून पनवेल येथे कार्यरत असलेल्या प्रणिती प्रभाकर काळे-खेरडे यांना परिवर्तन सामाजिक संस्था पुणे व जगदिशब्द फाउंडेशन च्या वतीने राज्यस्तरीय क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्काराने पुणे येथे सन्मानित करण्यात आले.

प्रणिती प्रभाकर काळे-खेरडे यांनी मुंबई विद्यापीठातून अनेक विषयात एम ए केले असून त्या नेट सेट परीक्षेत सुद्धा उत्तीर्ण झाल्या आहेत. त्याच प्रमाणे त्यांना साहित्यिक समाजसेविका व एक उत्तम वक्त्या म्हणून त्यांनी समाजात ओळख आहे. त्यांनी आता पर्यंत सामाजिक, शैक्षणिक व साहित्य क्षेत्रात केलेल्या कामाची दाखल घेऊन त्यांना परिवर्तन सामाजिक संस्था पुणे व जगदिशब्द फाउंडेशन च्या वतीने राज्यस्तरीय क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली मौजे : पळस्पे, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकत १) अविनाश यशवंत नार्वेकर, २) राहूल अविनाश नार्वेकर यांचे नावे महसूल दप्तरी ७/१२ चे कब्जेदार सदरी जमीन मालक म्हणून आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : पळस्पे, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| १) अविनाश यशवंत नार्वेकर<br>२) राहूल अविनाश नार्वेकर | १४५/३६ | ३६० चौ.मीटर | ३६.०० |

मौजे : पळस्पे, ता.पनेल, जि.रायगड येथील वर नमूद मिळकतीचे जमीन मालक ७/१२ मधील नमूद कब्जेदार १) अविनाश यशवंत नार्वे कर, २) राहूल अविनाश नार्वेकर यांची वरील नमूद शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताचे अनुषंगाने विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर नमूद केलेल्या शेतजमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा कब्जा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद जमीन मालक / कब्जेदार यांचे बरोबर ठरविलेला कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २२/१२/२०२२

**सही/-**

**मयुरेश प्र. हनुमंते**

**ॲडव्होकेट-हायकोर्ट**
**शॉप नं.बी/१०१, योगेश्वर कृपा बिल्डींग,**
**ठाणा नाका रोड, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८२८६१२१३३३**

---

# माथेरान मधील राजकीय कार्यकर्त्यांचा होतोय फुटबॉल

**दै.रायगड नगरी । माथेरान**

दुसऱ्या पक्षातून आपल्या पक्षात पक्षप्रवेश केल्यास मतपरिवर्तन आणि आपल्या पक्षातून दुसरीकडे गेल्यास गद्दार ही पक्षप्रवेशाची बाब सध्या माथेरान मध्ये जोरात सुरू असून जेमतेम चार हजारांच्या आसपास संपूर्ण गावातील मतदार संख्या असताना अन्य पक्षाचे कार्यकर्ते आपल्या गोटात समाविष्ट करण्यासाठी इथे स्पर्धाच सुरू झाली आहे. कार्यकर्त्यांचे पक्षप्रवेश करून घेण्यात सध्यातरी शिवसेनेचा शिंदे गट आघाडीवर दिसत आहे. काही प्रभागातील कार्यकर्त्यांनी स्वेच्छेने शिंदे गटात उडी घेतली आहे. महाविकास आघाडी मधील बहुतांश कार्यकर्त्यांना शिंदे गटाचे शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी यांनी आपल्या गोटात आधार दिला आहे.आपल्या राजकीय जादूने चंद्रकांत चौधरी हे काही प्रभागातील कार्यकर्त्यांना पक्षात खेचून आणण्यात यश मिळवत आहेत तर अन्य पक्षाच्या नेत्यांनी या होणाऱ्या प्रक्रियेबाबतीत सध्यातरी मौन बाळ-गले आहे.त्यांना ठाऊक आहे की अद्यापही नगरपरिषदेच्या निवडणुका लांबणीवर गेल्या आहेत त्यामुळे उगाचच आपल्या पक्षात प्रवेश करून काही काळ कार्यकर्त्यांना पोसण्यासाठी आर्थिक खर्च उचलावा लागणार आहे.सर्वच कार्यकर्ते हे अभ्यासू नसतात काहींना फक्त ओल्या आणि सुक्या पार्ट्या मिळाल्या की ते समाधानी होतात त्यामुळेच अन्य पक्षाचे



नेते बघ्याची भूमिका बजावत आहेत. ज्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनी मागील काळात ज्यांना ज्यांना सत्तेत स्थान दिले होते तेच सक्रिय कार्यकर्ते दुसरीकडे धूम ठोकताना दिसत आहेत. दर पाच वर्षांनी इथे हेच चित्र पहावयास मिळते यात नवल नाही परंतु या संपूर्ण पक्षप्रवेशाच्या प्रक्रियेत कार्यकर्त्यांना एखाद्या फुटबॉल प्रमाणे नेतेमंडळी उडवत असतात. सत्तेत सहभागी होईपर्यंत सगळेच नेते कार्यकर्त्यांना खूपच गोंजारून आपली पोळी भाजून घेतात आणि एकदा का सत्ता मिळाली की ज्यांनी निवडणुकीत आपल्या विरोधात प्रचार केला आहे त्यांना अधिक प्रमाणात जवळ घेतले जाते त्यांची सगळी कामे जलदगतीने पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जातात.

कार्यकर्ते हे सर्वसामान्य असतात त्यांना इतर काही बाबींची पुसटशी कल्पना नसते की ज्यांच्या सोबत आपण आहोत ज्यांच्यावर अती विश्वास ठेवून त्यांच्या सोबत कामे करणार आहोत ते खरोखरच एकदिलाने आपल्याशी एकनिष्ठ आहेत की नाही याबाबत हे कार्यकर्ते अनभिज्ञ असतात त्यामुळेच सर्वच पक्षाचे नेते याचा गैरफायदा घेऊन कार्यकर्त्यांचा प्रत्येक वेळेस वापर करून घेतात. हीच राजकीय मंडळी एकोप्याने आपले व्यवसाय असोत,आर्थिक देवाणघेवाण किंवा सभागृहात जाण्यासाठी राजकीय मदत घेत असतात. आणि जरी सत्तेत असले किंवा नसले तरी सुध्दा आपली कामे पूर्ण करून घेतात. यामध्ये केवळ कार्यकर्ता भरडला जातो आहे त्याला दर पाच वर्षांनी फुटबॉल प्रमाणे उडविले जाते आणि तो सुध्दा निमूटपणे हे सहन करत आहे.

---

## ग्रामपंचायत आकुर्ली

### ता.पनवेल, जि.रायगड

जा.क्र.३५५/ग्रा.पं./आस्था २०२२
ग्रामपंचायत आकुर्ली
दि.२२/१२/२०२२

प्रति,

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलाचे ग्रामपचांयत आकुर्ली कर आकारणी नोंद वहितील नावात बदल करण्याबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालील प्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

(वाचा : मुंबई ग्रामपंचायत अधिनियम ८ नियम ३२ (१))

| अ.क्र. | भाग क्र. | स.नं./प्रॉ.नं./फा.प्लॉट/ सदनिका / गाळा नं. | जुने नाव | नवीन नाव |
|---|---|---|---|---|
| १ | | साई आंगण आकुर्ली ४१६/३०२ | विजय त्र्यंबकराव सावंत | ललित दत्ताराम कलांगण<br>संगीता ललिता कलांगण |
| २ | | पनवेल पॅराडाईज आकुर्ली ३६०/I/२०२ | महम्मद मुस्तफा मोमिन उर्फ मोहम्मद मुस्तफा इक्बाल | राधा कन्नान |
| ३ | | पनवेल पॅराडाईज आकुर्ली ३६०/F/२०३ | मे.आशियाना रिअल्टी तर्फे भागीदार जिगर के.मेहता यांचे कु.मु.म्हणून मनिष नंदकुमार भोईर | स्नेहा ए कदम<br>आनंद भागुराम कदम |
| ४ | | श्री राम एनक्लेव्ह आकुर्ली ४१०/००५ | श्री राम बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार अभिषेक भारती प्रवीण श्यामसुंदर साहू, रमेश देवजी व इतर ४ | श्वेता ओमप्रकाश गाडेकर<br>ओमप्रकाश अण्णाभाऊ गाडेकर |
| ५ | | साई लिला आकुर्ली ३२१/०६ | सचिन भगवान बांदेकर<br>सुप्रिया सचिन बांदेकर | संपत सखाराम बेंगडे |
| ६ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७ /F/६०१ | सचिन अशोक ओव्हाळ | ज्ञानेश्वर दत्ताराम जाधव<br>प्रणाली दिनकर शिंदे |
| ७ | | मातेश्वरी कॉम्प्लेक्स आकुर्ली ३०८/D/१०४ | संतोष तुकाराम कोलगे<br>सुप्रिया संतोष कोलगे | रवींद्र शांताराम जाधव |
| ८ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७ /F/६०१ | चंद्रशेखर पी सोनटक्के<br>परमेश्वर आण्णा सोनटक्के | मोसमी सरदार |

वरील बाबत प्रकरण परत्वे आवश्यकतेनुसार ग्रामपंचायत आकुर्ली कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्याच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचारधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीचे प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायत आकुर्ली कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरील प्रमाणे नमूद दिलेल्या ममुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरण मुंबई ग्रामपंचायत अधिनियम प्रकरण ८ नियम ३२ (१) नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-** **सौ.भारती सचिन पाटील** **सरपंच** **ग्रामपंचायत-आकुर्ली** **ता.पनवेल, जि.रायगड**

**सही/-** **श्री.जयेंद्र घनशाम म्हात्रे** **ग्रामसेवक** **ग्रामपंचायत-आकुर्ली** **ता.पनवेल, जि.रायगड**

---

सिडको शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

## (हक्कसोड पत्राबाबत)

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे-न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील नमूद केलेली जमीन मुळ भूधारक **सखुबाई गोपाळ नाईक व इतर** यांच्याकडून नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली आहे.

भूसंपादन कायद्यानुसार सदर जमिनीची देय होणारी नुकसान भरपाई वरील भूधारकांनी स्विकारली असून संपादित जमिनीचा ताबा देखील त्यांनीच दिला आहे.

**१. संपादित जमीन व इरादित भूखंडाचा तपशील पुढीलप्रमाणे:**

| गावाचे नाव/ संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | संपादित क्षेत्र (हे.आर) | निवाडाधारकांची नावे | इरादित भूखंडाचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ.मी.) |
| संचिका क्र. १४३७/उलवे | वहाळ १३९ | १३१/४<br>२९९/७<br>२५८/१ | ०-११-९<br>०-०८-०<br>०-०६-४ | सखुबाई गोपाळ नाईक<br>रेऊबाई पोशा ठाकूर<br>काळूबाई दत्तू पाटील<br>देवुबाई मधू खारकर | उलवे | १८ | १६B | ५० चौ.मी. प्रस्तावित |
| | वहाळ १३७ | ३४६/४ | ०-०६-० | | | | | |
| | वहाळ १३८ | २६७/४<br>२५२/४ | ०-०६-०<br>०-०८-० | | | | | |
| **एकूण** | | | **०-४६-३** | | | | | |

शासन निर्णयानूसार वर नमुद संपादित जमिनीपोटी साडेबारा टक्के योजनेंतर्गत उलवे नोड येथे **भूखंड क्र. १६ B, सेक्टर १८, क्षेत्र ५० चौ.मी.** या भूखंडाचे इरादापत्र देण्यात आले आहे. सदर भूखंड वाटपास **१) श्री. गजानन पोशा ठाकूर २) श्री. अर्जुन पोशा ठाकूर ३) श्री. लक्ष्मण पोशा ठाकूर ४) सौ. अरुणाबाई हरिश्चंद्र ठाकूर ५) सौ. समिक्षा विक्रम ठाकूर ६) कुमार वेदांश विक्रम ठाकूर ७) श्रीमती देवकुबाई उर्फ देवुबाई मधू खारकर** हे भूधारक पात्र ठरतात.

सदर भूखंड वाटपास पात्र असलेल्या भूधारकांपैकी **१) श्री. गजानन पोशा ठाकूर २) श्री. अर्जुन पोशा ठाकूर ३) श्री. लक्ष्मण पोशा ठाकूर ४) सौ. अरुणा उर्फ अरुणाबाई हरिश्चंद्र ठाकूर ५) सौ. समिक्षा विक्रम ठाकूर ६) कुमार वेदांश विक्रम ठाकूर** यांनी सह दुय्यम निबंधक, पनवेल-२ यांच्याकडे हक्कसोड पत्र क्र. पवल ३-१७८२२-२०२२ अन्वये हक्कसोडपत्रक नोंदणीकृत करून प्रस्तावित भूखंडातील **२५ चौ.मी.** क्षेत्राचे लाभ **श्री. वामन पोशा ठाकूर** यांच्या लाभात हस्तांतरीत केले आहे. सदर हक्कसोडचे महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग दोन, गुरुवार, मे २९, २०१४/ज्येष्ठ ८, शके १९३६, असाधारण क्र. २९, प्राधिकृत प्रकाशन, महाराष्ट्र रिजनल टाऊन प्लानिंग ॲक्ट १९६६, नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारणा) विनियम, २००८ मधील विनियम १० नंतर समाविष्ट करावयाच्या **"१०अ"** मधील मूद्दा क्र. ii अन्वये सदर हक्कसोडपत्रामध्ये भूखंड क्र., सेक्टर क्र. व क्षेत्राचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

त्याप्रमाणे वर नमूद हक्कसोडपत्रामध्ये इरादित उलवे नोड येथील इरादित भूखंड **क्र. १६ B, सेक्टर १८, क्षेत्र ५० चौ.मी.** भूखंडाचा तपशील नमूद केला आहे. तसेच मौजे उलवे येथील, निवाडा क्र. १३९, सं.नं/हि.नं. १३१/४, २९९/७, २५८/१, निवाडा क्र. १३७, सं.नं/हि.नं. ३४६/४, निवाडा क्र. १३८, सं.नं/हि.नं. २६७/४,२५२/४, एकूण क्षेत्र ०-४६-३ हे.आर या संपादित जमिनीचा देखील उल्लेख केला आहे.

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तींची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तीचे नाव |
|---|---|
| १) श्री. गजानन पोशा ठाकूर<br>२) श्री. अर्जुन पोशा ठाकूर<br>३) श्री. लक्ष्मण पोशा ठाकूर<br>४) सौ. अरूणाबाई हरिश्चंद्र ठाकूर<br>५) सौ. समिक्षा विक्रम ठाकूर<br>६) कुमार वेदांश विक्रम ठाकूर | **श्री. वामन पोशा ठाकूर** |

उपरोक्त नोंदणीकृत हक्कसोडनुसार सिडकोकडून केवळ खालील व्यक्तीच उपरोक्त भूखंडाचे वाटप स्विकारून करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरू शकतात.

| हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तींची नावे |
|---|
| **श्री. वामन पोशा ठाकूर** |
| **श्रीमती देवकुबाई ऊर्फ देवुबाई मधूकर खारकर** |

वरील इरादित केलेल्या भूखंडासंदर्भात वर नमुद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार सोडले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे साडेबारा टक्के योजनेसंदर्भातील लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत /तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत/तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायलयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करून सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतीसह **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, ७ वा मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई** यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून (३०) दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमुद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजुन वरील इरादित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर जाहीर सूचना ही संबंधित गावाचे ग्रामपंचायत, तहसील कार्यालय तसेच सिडको व सिडकोला योग्य वाटेल अशा ठिकाणी सुचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

**सिडको/जनसंपर्क/३८२/२०२२-२३**

---

ॲड.रेखा होवाळे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे समोर

चौ.अर्ज नं.१९४८/२०२२
नि.नं.८
ने.ता.०३/०२/२०२३

श्री.प्रदीप गोवर्धन ढाके
रा.१/३, राजेंद्र नगर दत्तापाडा,
बोरिवली (इस्ट), मुंबई-४०००६६ — अर्जदार

ज्यापेक्षा मयत श्री.गोवर्धन सखाराम ढाके यांचा मृत्यू दि.२५/०६/२०१७ रोजी ठाणे येथे निधन झाले आहे. अर्जदार हा मयताचा मुलगा आहे. आणि अर्जदार यांनी खालील मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

**SCHEDULE OF PROPERTY 'A'**

Name of the Property Holder : Late Govardhan Sakaharam Dhake

Flat No.03, In the building known / numbered as C-5, Ground Floor, Kendriya Vihar (6), Sector-11, Kharghar, Navi Mumbai, Taluka Panvel, District Raigad-410210. Admeasuring area 98.72 Sq. Mtrs. Agreement Value Rs. 12,00,000/- (Rupees Twelve Lakhs Only)

यासाठी सर्टीफिकेट मिळावे असा अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजविण्याचे असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत कोर्टात हजर राहून आपली हरकती कळवाव्यात. आणि या लेखी नोटीसवरुन असे कळविण्यात येते की, तसेच योग्य मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट या अर्जदारास ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयत यांचा वारस घोषित करेल.

दि.२२ माहे १२ सन २०२२ बेलिफाकडे

**कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : करवले बुद्रुक, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील धर्मुबाई लक्ष्मण पाटील व जोमुबाई नामदेव गोंधळी यांचे मालकीची व ताबेकब्जातील खालील वर्णनाची जमीन मिळकत आम्ही कायम स्वरुपात विकत घेण्याचा विचार केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : करवले बुद्रुक, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १० | ४ | ०-१४-४० | ०.२५ |

सबब वर नमूद शेतजमीन मिळकतीवर किंवा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षिस, चार्ज, लाज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत हक्क हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

दि.२३/१२/२०२२
पनवेल

**सही/-**

**ॲड.प्रविण दत्तू पाटील**

**हरिओम नगर, फ्लॅट नंबर बी-२,**
**तळमजला, कफ नगर, ठाणा नाका,**
**जुने-पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९९२०९९५९९६**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# पनवेल महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील पनवेल शहरतील नागरिकांना सुचित करण्यात येते की, सोमवार दि.२६/१२/२०२२ रोजी पासून पनवेल शहरामध्ये जलकुंभ निहाय आठवड्यातून एक दिवस पाणी पुरवठा बंद राहणार आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.....

| अ.क्र. | जलकुंभाचे ठिकाण | वार | जलकुंभाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | सर्व्हिस हौद जुने उंच जलकुंभ | सोमवार | अर्धा भाग चालू / अर्धा भाग बंद |
| २ | सर्व्हिस हौद जुने उंच जलकुंभ | मंगळवार | अर्धा भाग बंद / अर्धा भाग चालू |
| ३ | भाजी मार्केट उंच जलकुंभ | सोमवार | भाजी मार्केट उंच जलकुंभातून पूर्ण दिवस पाणी पुरवठा बंद |
| ४ | मार्केट यार्ड उंच जलकुंभ | सोमवार | मार्केड यार्ड उंच जलकुंभातून पूर्ण दिवस पाणी पुरवठा बंद |
| ५ | पटेल मोहल्ला उंच जलकुंभ | मंगळवार | पटेल मोहल्ला उंच जलकुंभातून पूर्ण दिवस पाणी पुरवठा बंद |
| ६ | सर्व जलकुंभातून पाणी सुरू | बुधवार | सर्व जलकुंभातून पाणी सुरू |
| ७ | ठाणा नाका उंच जलकुंभ व हरिओम नगर बायपास | गुरुवार | ठाणा नाका उंच जलकुंभातून व हरिओम नगर बायपास पूर्ण दिवस पाणी पुरवठा बंद |
| ८ | सर्व्हिस हौद नवीन उंच जलकुंभ / गंगाराम सिनेमा उंच जलकुंभ | गुरुवार | अर्धा भाग चालू / व अर्धा भाग बंद |
| ९ | सर्व्हिस हौद नवीन उंच जलकुंभ / गंगाराम सिनेमा उंच जलकुंभ | शुक्रवार | अर्धा भाग बंद / व अर्धा भाग चालू |
| १० | सर्व जलकुंभातून पाणी सुरू | शनिवार | सर्व जलकुंभातून पाणी सुरू |
| ११ | सर्व जलकुंभातून पाणी सुरू | रविवार | सर्व जलकुंभातून पाणी सुरू |

सही/-
अभियंता, पायाभूत सोई सुविधा
पनवेल महानगरपालिका

सही/-
उप अभियंता (पापु)
पनवेल महानगरपालिका

# पनवेल महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

## नागरिकांना जाहिर आवाहन

पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल शहरातील नागरिकांना सुचित करण्यात येते की, शहरास होणारा पाणी पुरवठा हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र औद्यागिक विकास महामंडळ व देहरंग धरण मिळून एकत्रितपणे करण्यात येतो. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण , महाराष्ट्र औद्यागिक विकास महामंडळ या संस्थेस पाताळगंगा नदीतुन दर रविवार व सोमवार या दिवशी कमी पाणी मिळते व इतर काळात इलेक्ट्रिक शटडाऊन, ब्रेकडाऊनमुळे दोन्ही संस्थेकडून वारंवार कमी पाणी मिळत असल्याने देहरंग धरणाचे जास्त पाणी घेवून शहराची दररोजची गरज भागविण्यात येते. परंतु त्यामुळे धरणातील पाणीसाठा कमी झाला, ही वस्तूस्थिती विचारात घेता धरणातील शिल्लक असलेला पाणीसाठा माहे १५ जून २०२३ पर्यंत पुरविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. या दृष्टीने सोमवार दि.२६/१२/२०२२ रोजीपासून पनवेल शहरामध्ये उंच जलकुंभ निहाय एक भाग आठवडयातून एक दिवस बंद ठेवण्यात येणार आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

